नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०७/०४/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ०७/०४/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे पारशिवनी हद्दीतून शिवाजी चौक पारशिवनी नागपूर मार्गाने ४ चाकी चॉकलेटी रंगाची महिंद्रा झायलो गाडी क्रमांक एमएच–४३/एक्स–३१२३ चा चालकाने त्याचे गाडी मालकाचे सांगण्यावरून कत्तली करिता गौवंश जनावरे ची अवैध वाहतुक करीत आहे. अश्या माहिती वरून शिवाजी चौक पारशिवनी येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पारशिवनी पोलिस स्टाफ च्या मदतीने नाकाबंदी केली असता सदर वाहन चालकाने नाकाबंदी च्या ठिकाणी वाहन न थांबविता थोडे समोर थांबवून त्याच्या ताब्यातील गाडी घटनास्थळावर सोडून पळून गेला. सदर वाहन चालकाचां पाठलाग केला असता वाहन चालक हा मिळून आला नाही. वाहनाची पाहणी केली असता त्यात ६ गायी व १ गोरा कि. ७०,०००/–रू. चे जनावरे क्रुर व निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. घटनास्थळावरून एकुण ७ जनावरे किमंती ७०,०००/–रूपयाचे व महिंद्रा झायलो गाडी क्रमांक एमएच–४३/एक्स–३१२३ किमंत ५,००,०००/– रूपये असा एकुण कि. ५,७०,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार चंद्रशेखर गाडेकर स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ११(१)(घ)(ड)(च) सहकलम ५,(अ),(९) सहकलम १०९ भादवि सहलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार संदीप कडू मो.क्र. ९८२३७२२४१८ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहायक फौजदार चंद्रशेखर गाडेकर, पोलीस नाईक मयुर ढकले, अमृत किंनगे, रोहन डाखोरे, अमोल वाघ यांचे पथकाने पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर